अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - २६ जुलै, २०१० .

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ नं. West/ १-६५९५१८१/२०१०/New, दिनांक १३ जुलै, २०१०.

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन दिनांक १३ जुलै, २०१० च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | सूर्योदय कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, उमरेर रोड, ता. व जि. नागपूर. | १) सिव्हिल इंजिनिअरींग | ६० |
| | | २) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | ५) इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | एकूण | ३०० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :१४ फेब्रुवारी, २०११ .

संदर्भ :- १)अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.
एफ नं. West/१-६५९५१८१/२०१०/New, दिनांक १३ जुलै, २०१०
२) शासन निर्णय क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४, दिनांक २६ जुलै, २०१०
३) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.
Corrigendum, F.No. West-६५९५१८१/२०१०/New दिनांक ११/१/२०११

**शासन शुद्धीपत्रक** :- वरील संदर्भाधिन २ शासन निर्णयात सूर्योदय कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅण्ड टेक्नॉलॉजी, उमरेर रोड, ता. व जि. नागपूर या संस्थेच्या नावासमोर अनु. क्र. ४ येथे दर्शविलेला 'इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरींग ' (प्रवेशक्षमता ६०) या अभ्यासक्रमाऐवजी 'इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग' (प्रवेशक्षमता ६०) असे वाचावे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
**प्रत माहितीसाठी**
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून मान्यता दिलेल्या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

शासन निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र. १८/तांशि-४,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : ९ फेब्रुवारी, २०१२.

संदर्भ : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पत्र क्र. Western/1-412370791/2011/EOA, दिनांक १ सप्टेंबर, २०११.

**प्रस्तावना** : रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०११ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०११ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये प्रवेशप्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष **२०१२-१३ मध्ये** प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. **त्यास अनुसरुन नॅशनल रुरल डेव्हलपमेंट रिसर्च सोसायटीचे** सूर्योदया कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, **सर्व्हे नं. ११७/१** आणि ११७/३ए, **विहिरगांव**, नागपूर ४४१२०४ या महाविद्यालयात **शैक्षणिक** वर्ष २०१२-**१३ पासून मेकॅनिकल** इंजिनिअरींग **या अभियांत्रिकी** पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० वरुन १२० पर्यंत **वाढविण्यास शासनाची** मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : नॅशनल रुरल डेव्हलपमेंट रिसर्च सोसायटीचे सूर्योदया कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सर्व्हे नं. ११७/१ आणि ११७/३ए, विहिरगांव, नागपूर ४४१२०४ या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून मेकॅनिकल इंजिनिअरींग या अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ६० वरुन १२० पर्यंत वाढविण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधारकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीनुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंगसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

प्रत माहितीसाठी :-
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती/तांशि-४

D:\Lole\TE \Court\GR\Modern College.doc